aarambh
शोध नव्या क्षितिजाचा




# Aarambh Autism Awareness Week 2024

# Promoting Understanding and Acceptance

## 1 to 7 April 2024

Autism Awareness Week is an annual event of Aarambh Autism School aimed at raising awareness and understanding about autism spectrum disorder (ASD). It provides a platform to educate the public, challenge misconceptions, and promote acceptance and inclusion of individuals with autism. This report highlights the significance of Autism Awareness Week and summarizes key initiatives and outcome from the most recent awareness campaign.

## Key Objectives:

**1. Raise Awareness:**Increase public understanding of autism and its impact on individuals and families.

**2. Promote Acceptance:**Encourage acceptance and inclusion of individuals with autism in all aspects of society.

**3. Support Advocacy:** Provide resources and support for advocacy efforts aimed at improving services and opportunities for individuals with autism.

**4. Foster Empathy:**Promote empathy and understanding amongst the general population towards the experiences of individuals with autism.

**Empowering Autistic Voice**

**Aarambh Society for Autism and slow learner children, Chh. Sambhajinagar, Mo. 8275284178**

# Inauguration of Awareness week and Poster

On World Autism Day, ‘Arambh’ Autism and Slow Learner Children's School was launchedthe campaign with a series of impactful street dramas and poster displays across various locations, including tourist spots on 1 April 2024 at Aarambh school.






On this occasion, B. S. Rajpalchairman, Manjeet Pride Group and Dr.Shiv Kumar Bhagat, Superintending Archeologistpresent as chief gust. During the ceremony, a poignant poster on autism was unveiled, slated to be displayed in children's hospitals, kindergartens, and primary schools throughout the city.



Mamta Sharma was honored withBest Parent Awardthis year's recipient.

## Parent’s words



Ms.Nikhat Sheikh, Ms. Pallavi Sonawane,Ms. Aruna Jadhav, and Mrs. DhananjayAnantwar shared their inspiring journeys of nurturing autistic children, underscoring the importance of parental acceptance and societal support.

### Signature Campaign




Signature campaign started by the hand of B. S. Rajpal chairman, Manjeet Pride Group and Dr.Shiv Kumar Bhagat.

# Community Events:

### Interview of parents on MGM Radio




MGM Radio recently conducted an insightful interview featuring AmbikaTakalkar, the director of Aarambh, and the parents of children attending Aarambh, shedding light on the journey of parenting an

autistic child and the importance of acceptance. During the interview, they delved into their personal experiences, discussing the challenges they faced and the milestones they achieved.

## Article in Newspaper

दिव्य मराठी   मधुरिमा   02-04-2024

निमित्त ✍ अंबिका टाकळकर

**२ एप्रिल हा जागतिक ऑटिझम जागरूकता दिन. 'ऑटिझम' म्हणजे नक्की काय, असा प्रश्न अनेकांच्या मनामध्ये आजही अगदी सहजपणे निर्माण होतो. अर्थात, 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे...' अशी स्थिती या ठिकाणीही दिसते. इतरांच्या ठायी याबाबत असलेली एकूणच अनभिज्ञता हेदेखील यामागचे एक मुख्य कारण असू शकते.**

# स्वमग्नतेच्या जगात...

काही वर्षांपूर्वी आपल्या दोन वर्षांच्या मुलाला घेऊन अनिता माझ्याकडे आली होती. शारीरिकदृष्ट्या काहीच वैगुण्य नाही, पण बोलणे कमी, एकटेच राहणे, फार मऊ किंवा फार खडबडीत स्पर्श नकोसा वाटणे, शून्यात नजर लावून बसणे, चिडचिड करणे, उगीचच रडणे लक्षणं होती. दोन वर्षांच्या बाळाचे निदान करून अनिताला हे सगळे समजून सांगितले तेव्हा तिला साहजिकच मोठा धक्का बसला. खरं तर आपले बाळ स्वमग्न (ऑटिस्टिक) आहे हा स्वीकार खूप महत्त्वाचा असतो. तो स्वीकार करून त्यावर लवकरात लवकर उपचार होणे गरजेचे असते, ज्याला आम्ही 'शीघ्र निदान शीघ्र उपचार' असे म्हणतो. लवकर उपचार मिळाले तर मुलांमध्ये आमूलाग्र बदल घडून येतात. अनिताला आणि तिच्या घरच्यांना हे स्वीकारणं कठीण होतं, पण त्यांनी आपल्या बाळाचा स्वीकार केला आणि त्याच्यासाठी उत्तम उपचार, थेरपी सुरू केली. स्वमग्न मुलांसाठी उपचार आणि शिक्षण पद्धती वेगळी असते.

आज अनिताचा मुलगा अनेक गोष्टींमध्ये सक्षम झाला आहे. स्वतःच्या सगळ्या गोष्टी तर उत्तम करतोच आहे, पण त्याने या वर्षी बारावीची परीक्षा पण दिली आहे. घरातल्या सगळ्या कामात मदत करतो आहे तसेच शाळेमध्ये व्यावसायिक वर्गात उत्तम कामे पण करतो आहे. कदाचित अजून दोन वर्षांत तो आर्थिक सक्षम नक्कीच झालेला असेल. आता अनिताला काळजी वाटते की, आमच्यानंतर तिच्या मुलाचे काय होईल? या प्रश्नाचे उत्तर तिला सतावत असते. त्यासाठी मात्र अनेक पर्याय समोर आहेत, ज्यामध्ये प्रामुख्याने निवासी सुविधा असणारी एखादी संस्था, काही पालकांनी एकत्र सहजीवनाचा घेतलेला निर्णय किंवा आपल्यानंतर त्या मुलाची जो कोणी काळजी घेणार त्याबद्दल लोकल पालक नेमणे यासारखे पर्याय आहेत.

स्वमग्न बालकात शारीरिक व्यंग नसल्याने या मुलांच्या बोलण्या-वागण्यातूनच या आजाराची लक्षणे ओळखावी लागतात. त्यामुळे अनेकदा आजार उशिरा लक्षात येतो. संपूर्ण महाराष्ट्रात स्वमग्नता काय आहे ते बऱ्याच जणांना माहीत नाही. स्वतःच्याच विश्वात, विचारात रमणे म्हणजे स्वमग्नता. ही स्वमग्न मुले नेहमी समाजापासून, अवतीभोवतीच्या वातावरणापासून अलिप्त राहतात. नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, आजूबाजूचे लोक यांच्याशी त्यांना काहीही देणंघेणं नसतं. स्वमग्न मुलांमध्ये प्रामुख्याने जाणवणारी समस्या म्हणजे भाषा संप्रेषणाची, वैचारिक देवाण-घेवाणीची. सोप्या शब्दात समजावयाचं म्हणजे आपल्याला एखाद्या अनोळखी प्रदेशात, अनोळखी लोकात एकटे नेऊन सोडले तर? आपण गोंधळून जाऊ. आपल्याला त्या लोकांची भाषा समजणार नाही वा आपली त्यांना! अशा वेळी आपली जी स्थिती होईल नेमकी तशीच स्थिती या स्वमग्न मुलांची असते. म्हणूनच ही मुलं परिसराशी संपर्क नसल्यासारखी वागतात. बाह्य जगाशी यांचा काहीही संबंध नसतो. आपले बोलणे त्यांना ऐकू जाते व बरेचदा ती त्याप्रमाणे वागतातदेखील. पण त्यांचे डोळे आपल्याकडे बघत नाहीत. नजरेला नजर देत नाहीत. त्यांच्याकडून शाब्दिक प्रतिसाद फार क्वचित मिळतो. त्यामुळे कित्येकदा या मुलांवर मतिमंदत्वाचा शिक्का मारला जातो. पण यापैकी बरीचशी मुलं ही मतिमंद नसतात. या मुलांना तात्पुरत्या स्वरूपाचे संबंध वा व्यवहार जमत नाहीत. त्यामुळेच तर ती स्वतःमध्ये मश्गूल असतात.

स्वमग्न मुलांना नुसतेच शाळेत घालून उपयोग नसतो तर वेगवेगळ्या उपचार पद्धतींचा अवलंब करावा लागतो. शाळांमध्ये प्रत्येक मुलाची क्षमता लक्षात घेऊन त्याप्रमाणे आयईपी तयार करण्यात येतो. त्यानंतर प्रायमरी गोल ठरवून त्यावर काम करण्यात येते. विशेष शिक्षण, स्पीच थेरपी, फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, म्युझिक थेरपी, डान्स थेरपी तसेच ड्रामा थेरपीनुसार मुलांना शिकवले जाते.

प्रत्येक थेरपिस्ट हा साधारण एक तासाची थेरपी देत असतो, पण पालक मुलासोबत उरलेले २२-२३ तास असतात. त्यामुळे मुलांना जास्तीत जास्त योग्य प्रकारे ते शिकवू शकतात. फक्त त्यासाठी गरज असते ते विशेष शिक्षण समजून घेण्याची. शाळेत, थेरपिस्ट जे सांगितलं ते त्या मुलांकडून करून घेण्याची आणि त्या मुलाला समजून घेण्याची. हे जर पालकांना साधता आले तर मुलांमध्ये उत्तम बदल घडून येतात. फक्त ए बी सी डी, एक दोन म्हणजेच येणं जितके महत्त्वाचे आहे त्यापेक्षा मुलांना दैनंदिन गरजेच्या सगळ्या गोष्टी करता येणे जास्त महत्त्वाचे आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने स्वतःची वैयक्तिक स्वच्छता तसेच कपडे घालणे-काढणे, घरातील छोटी छोटी कामे करता येणे हे पण महत्त्वाचे आहे.

▪ उर्वरित पान. ४



प्रातिनिधिक छायाचित्र

### ऑटिस्टिक मुलांची लक्षणे

- स्वमग्न असणे.
- सतत एकच वर्तन करणे, म्हणजे उगीचच हात हलवणे, उड्या मारणे, गोल फिरणे वगैरे.
- सतत रडणे वा हसणे किंवा क्षणात हसणे वा रडणे.
- एखादा शब्द किंवा वाक्य सतत बोलत राहणे तसेच आपण म्हटलेला शब्द किंवा वाक्य परत परत उच्चारणे.
- स्पेशल स्किल्स नसणे.
- वास्तवातील गोष्टींची कल्पना करू न शकणे, पण कल्पनाशक्ती अफाट असणे.
- अति ॲस्पर्नजर सिंड्रोम मुले काही कलांमध्ये निपुण असतात. **उदा.**– गाणी, चित्रकला, कोडी, आकडेवारी, मोठी आकडेमोड तसेच वर्षानुवर्षांची कॅलेंडरची तारीख, वार, महिना किंवा रेल्वेचे वेळापत्रक पाठ करण्याची ताकद या मुलांकडे असू शकते. अल्बर्ट आइन्स्टाइनसुद्धा ऑटिस्टिक होते असे म्हणतात.
- या मुलांना सेन्सरी डिफेन्सिफेन्सिव्हनेस असू शकतो. म्हणजे वास, चव, आवाज, स्पर्श आणि दृश्य यांच्यापैकी कशाच्या तरी बाबतीत आवडीनिवडी टोकाच्या असतात, पण ऑटिस्टिक मुलांच्या बाबतीत ती निवड टोकाची असू शकते. त्याचा त्रास त्यांना असहाय होतो व ही मुलं आऊट ऑफ कंट्रोल होतात.

## Street play

### At siddharth Garden

A street play was organized at Siddharth Garden,Ellora Caves, BibikaMaqbara featuring presentations by Aarambh  teachers for autism awareness.










## At Ellora Caves












## At Bibi ka Makbra










## Visit to Hotel Taj Vivanta





Hotel Taj Vivanta invited Aarambh Students and organized activates featuring painting, games with delicious food.

## Aarambh’s Autism week in News

आहेत. हे पैसे हडप करण्याचा कंपनीचा डाव असल्याचा आरोप वाहकांनी केला आहे.

नाही. चोराने ती चोरून नेल्याची तक्रार त्यांनी सोमवारी (ता. एक) जवाहरनगर पोलिस ठाण्यात दिली.

### चला, स्वमग्न मुलांचा स्वीकार करू!



**सिद्धार्थ उद्यान :** ‘आरंभ’च्या स्वमग्नता सप्ताहात पथनाट्य सादर करताना एमजीएम नाट्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी.

सिद्धार्थ उद्यान, ता. २ : आरंभ ऑटिझम सेंटरच्या वतीने ‘स्वमग्नता जनजागृती सप्ताहास’ प्रारंभ झाला. या अंतर्गत एमजीएम नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी (ता. दोन) सिद्धार्थ उद्यानामध्ये पथनाट्य सादर झाले.

यावेळी आरंभच्या प्रज्ञा देशपांडे आणि पालक उपस्थित होते. तत्पूर्वी सोमवारी आरंभ शाळेत स्वमग्नता जनजागृती मोहिमेअंतर्गतमनजित प्राइड ग्रुपचे अध्यक्ष बी. एस. राजपाल, पुरातत्त्व विभागाचे अधीक्षक डॉ. शिवकुमार भगत, आरंभच्या संचालिका अंबिका टाकळकर यांच्या उपस्थितीत पोस्टरचे अनावरण झाले.

ऑटिझमविषयक पोस्टर शहरातील लहान मुलांचे रुग्णालय, बालवाड्या, प्राथमिक शाळा येथे लावण्यात येणार आहे. यंदापासून ‘आरंभ सर्वोत्कृष्ट पालक’ पुरस्कार देण्यात येणार आहे. यावर्षीच्या पुरस्कारासाठी ममता शर्मा यांची निवड झाली. निखत शेख, पल्लवी सोनावणे, अरुणा जाधव आणि धनंजय अनंतवार या पालकांनी स्वमग्न मुलांना वाढवतानाचा त्यांचा प्रेरणादायी प्रवास उलगडला. टाकळकर यांनी स्वमग्नता जनजागृतीचे महत्व प्रास्ताविकात सांगितले. आरंभचे विश्वस्त मिलिंद दामोदरे यांनी स्वमग्न मुलांसाठी हक्काचे घर असावे त्यासाठी आरंभ करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. या उपक्रमासाठी आनंद पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक विजयश्री जाईबहार, अश्विनी वांढेकर, नीलिमा वावरे, पल्लवी सोनवणे, शोयेब शेख, किरण जोशी, सिद्धेश रेवनकर, सोनल आणि रजिया मावशी पुढाकार घेत आहेत.

लोकमत समाचार

### एक विशेष को संभालना सामान्य दस बच्चों को संभालने के बराबर



छत्रपति संभाजीनगर में सोमवार को विश्व ऑटिज्म दिवस पर सर्वोत्कृष्ट अभिभावक के रूप में ममता शर्मा का सम्मान किया गया. इस अवसर पर उपस्थित डॉ शिवकुमार भगत, आरंभ संस्था की संचालिका अंबिका टाकलकर व अन्य.

**विश्व ऑटिज्म दिवस पर जागरूकता सप्ताह की शुरुआत, सर्वोत्कृष्ट अभिभावक के रूप में ममता शर्मा का सम्मान**

लोकमत समाचार सेवा

**छत्रपति संभाजीनगर.** विश्व ऑटिज्म दिवस के अवसर पर सोमवार को आरंभ संस्था द्वारा ऑटिज्म को लेकर जागरूकता सप्ताह की शुरुआत की गई. शहर के पर्यटन स्थलों के साथ ही अन्य स्थानों पर पोस्टर-बैनर और नुक्कड़ नाटक के माध्यम से लोगों को इस बीमारी के बारे में बताया गया.

कार्यक्रम की प्रस्तावना आरंभ संस्था की संचालिका अंबिका टाकलकर ने रखी. जागरूकता सप्ताह का उद्घाटन पुरातत्व विभाग के अधीक्षक डॉ शिवकुमार भगत व बीएस राजपाल ने किया. यहां आरंभ संस्था द्वारा ममता शर्मा को सर्वोत्कृष्ट अभिभावक पुरस्कार प्रदान किया गया. अभिभावक निखत शेख, पल्लवी सोनवणे, अरुणा जाधव और धनंजय अनंतवार ने ऑटिज्म पीड़ित बच्चों के प्रेरणादायी सफर के बारे में जानकारी प्रदान की. संस्था के न्यासी मिलिंद दामोदरे ने ऑटिज्म पीड़ित बच्चों के लिए किए जा रहे कार्यों के बारे में बताया. कार्यक्रम को संबोधित करते हुए डॉ शिवकुमार भगत ने कहा कि, स्वमग्न बच्चों को मुख्य धारा से जोड़ने के लिए आम नागरिकों को आगे आने की आवश्यकता है. बीएस राजपाल ने कहा कि, एक विशेष बच्चे को संभालना दस सामान्य बच्चों को संभालने के बराबर है. यह अभिभावकों की सहनशक्ति की परीक्षा है. इस अवसर पर अतिथियों ने ऑटिज्म विषय पर आधारित पोस्टर का विमोचन किया. ऑटिज्म से पीड़ित बच्चों को व्यवहारिक ज्ञान प्रदान करने के लिए आनंद नगरी आयोजित की गई. ऑटिज्म जागरूकता सप्ताह में 4, 6, 8 व 10 अप्रैल को विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया जाएगा. इस अवसर पर आनंद पॉल, विजयश्री जाईबहार, अश्विनी वांढेकर, नीलिमा वावरे, शोएब शेख, रऊफ भाई, किरण जोशी, सिद्धेश रेवनकर, सोनल, रजिया आदि उपस्थित थे.

Apna Shahar
Page No. 4 Apr 03, 2024
Powered by: erelego.com



शहरातील सिद्धार्थ उद्यान येथे पथनाट्याद्वारे स्वमग्रताविषयी जनजागृती करताना शिक्षक व विद्यार्थी.

### पोस्टर, पथनाट्याद्वारे स्वमग्रताविषयी जनजागृती

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** स्वमग्रता (ऑटिझम) बाबत समाजात जनजागृती व्हावी आणि स्वमग्र मुलांना सर्वसामान्य मुलांप्रमाणे वागणूक मिळावी यासाठी स्वमग्रता दिन अर्थात वर्ल्ड ऑटिझम डे च्या निमित्ताने शहरात पोस्टर आणि पथनाट्य सादरीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. या मोहिमेचे उद्घाटन सोमवारी (दि.१) पुरातत्त्व विभागाचे अधीक्षक डॉ.शिवकुमार भागत यांच्या हस्ते झाले. तर, मंगळवारी (दि.२) सिद्धार्थ उद्यान येथे पथनाट्याव्दारे जनजागृती करण्यातआली.

स्वमग्रता म्हणजेच ऑटिझम हा एक दुर्लक्षित विषय असून, याबाबत अद्यापही समाजात जनजागृती नसल्याने स्वमग्रता आणि स्वमग्र मुले यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन उदासीन आहे. स्वमग्र मुलांना सर्वसामान्य मुलांप्रमाणे वागणूक मिळावी यासाठी आरंभ संस्थेच्या वतीने स्वमग्रता दिन अर्थात वर्ल्ड ऑटिझम डे च्या निमित्ताने पोस्टर आणि पथनाट्य सादरीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

मंगळवारी सिद्धार्थ उद्यान येथे संस्थेचे शिक्षक व विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. या पथनाट्याव्दारे स्वमग्र मुलांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी समाजाने पुढे आले पाहिजे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दिव्य मराठी
दिव्य सिटी 02-04-2024

### मोबाइलमुळे सुडो ऑटिझमचे प्रमाण पाच टक्क्यांनी वाढले

**ऑटिझम डे • सरकारी अनुदान थांबल्यामुळे विशेष मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थांसमोर वाढल्या अडचणी**

गिरीश काळेकर | छत्रपती संभाजीनगर

सात-आठ महिन्यांपासून ३ तासांपेक्षा अधिक काळ बालकांचा मोबाइल संपर्क वाढल्याने सुडो ऑटिझमचे प्रमाण ५ टक्क्यांनी वाढल्याचे तज्ज्ञांच्या अनुभवातून पुढे येत आहे. त्याचे प्रमाण कोविडपूर्वी ३ टक्के होते, ते आता ७ टक्क्यांपर्यंत पोहोचले असल्याचे त्यांनी नमूद केले. यामुळे मुलांचे बोलणे, एकमेकांत मिसळणे, खेळणे या विकासाच्या टप्प्यांमध्ये अडथळा निर्माण होत आहे. ऑटिझम म्हणजे स्वमग्नता. यात दोन प्रकार आहेत. न्यूरोलॉजिकल आणि सुडो ऑटिझम. सुडो ऑटिझम म्हणजे बाह्य कारणांमुळे मुलांच्या वर्तनात होणारा बदल. गतिमंद अशा वेगळ्या वर्तनाच्या मुलांसाठी शहरात आरंभ, नवजीवन व एमजीएम ऑटिझम सेंटर्स सुरू आहेत. त्यातील मुलांची संख्या वाढत असल्याचे नवजीवन पालक संघाचे अध्यक्ष आर. पी. दुसे यांनी सांगितले. या मुलांना भाजी मार्केटला घेऊन जाणे, इतर मुलांसोबत खेळू द्यावे, असा सल्ला समुपदेशक संदीप सिसोदे यांनी दिला.

**ही आहेत लक्षणे**

- एकाच जागी बसून राहणे
- चपळपणे हालचाल न करता हातवारे करून सांगणे
- कमी बोलणे, गरजेपुरता संवाद साधणे

**संस्थांना अनुदान व मुलांच्या पुनर्वसनाची गरज**



*शहरात २०११ नंतरच्या संस्थांना अनुदान नाही. मुलांचे पुनर्वसन, वसतिगृह हे प्रश्न बाकी आहेत. प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे.*

**अंबिका टाकळकर,** संचालिका, आरंभ सेंटर

**मोबाइलमुळे परिणाम**

*वयाच्या नवव्या महिन्यापासून कार्टून पाहण्यासाठी मोबाइल हाती देत होतो. यानंतर काही महिन्यांनी तो स्वत:च्या पायाला मारून घेत होता. नंतर तो स्वत:च्या गालावर मारून घेत असे. आज तो पाच वर्षांचा असून त्यापासून मोबाइल दूर केला आहे.*

**मोहन कर्मोकार,** पालक

THE FREE PRESS JOURNAL
e-Paper | Get App
HOME MUMBAI NEWS FPJ SHORTS ELECTIONS 2024 ENTERTAINMENT BUSINESS FEATURES INDIA SPORTS VIRAL VIDEOS WEBSTORIES EDUCATIC

### Launched On World Autism Day

*On this occasion, B. S. Rajpal emphasized the remarkable strength of parents raising special children, likening it to caring for ten normal children. Dr. Bhagat echoed the sentiment, urging society to embrace and integrate autistic children into mainstream activities.*

Staff Reporter | **Updated:** Wednesday, April 03, 2024, 02:14 PM IST





डिकॅथलॉन
Running Products from ₹199
Decathlon's New Running Collection, Visit Store & Shop Today
Store info
Directions

RECENT STORIES

Pune Faces Water Scarcity: 93 Tankers Deployed, Dam Storage Declines To 35.99%

Lok Sabha Election 2024: BJP Likely To Change Its Candidate From Jalgaon

Pune: LGBTQ+ Community In City



# पर्यटनस्थळांवर जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक स्वमग्नता दिनानिमित्त आरंभ स्वमग्न व गतिमंद मुलांच्या शाळेतर्फे पर्यटनस्थळांसह विविध ठिकाणी पोस्टर आणि पथनाट्यातून जनजागृती करण्यात येत आहे.

या मोहिमेचे उद्‌घाटन सोमवारी मनजित प्राइड ग्रुपचे बी. एस. राजपाल आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणचे अधीक्षक डॉ. शिवकुमार भगत यांच्या हस्ते झाले. यावेळी ऑटिझमविषयक पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. वेरूळ लेणी, बीबी का मकबरा, क्रांती चौक आणि निराला बाजार येथे अनुक्रमे ४, ६, ८ आणि १० एप्रिल रोजी जनजागृतीसाठी पथनाट्य दु. ४ वाजता सादर करण्यात येईल. नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अंबिका टाकळकर यांनी केले.

ऑटिझमविषयक पोस्टरचे प्रकाशन करताना भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणचे अधीक्षक डॉ. शिवकुमार भगत, बी. एस. राजपाल, अंबिका टाकळकर आदी.



सांजवार्ता

Page No.: 2
Date : 03/04/2024

## पर्यटनस्थळांसहित विविध ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण

छत्रपती संभाजीनगर, (सांजवार्ता ब्युरो) : स्वमग्नता (ऑटिझम) हा तसा दुर्लक्षित विषय. याबाबत अद्यापही समाजात जनजागृती नसल्याने स्वमग्नता आणि स्वमग्न मुले यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन उदासीन आहे. स्वमग्न मुलांना सर्वसामान्य मुलांप्रमाणे वागणूक मिळावी यासाठी आरंभ स्वमग्न व गतिमंद मुलांची शाळा मागील बारा वर्षापासून प्रयत्न करत असून यावर्षीही स्वमग्नता दिन अर्थात वर्ल्ड ऑटिझम डे च्या निमित्ताने पोस्टर आणि पथनाट्य सादरीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

दि. १ एप्रिल रोजी जनजागृती मोहिमेचे उदघाटन मनजित प्राईड ग्रुपचे अध्यक्ष बी.एस.राजपाल आणि पुरातत्व विभागाचे अधिक्षक डॉ.शिवकुमार भगत यांच्या हस्ते झाले. एक विशेष मुल सांभाळणे दहा नॉर्मल मुलांना संभाळण्यासारखे आहे. पालकांच्या सहनशक्तीची खरी परिक्षा यथे असते. विशेष मुलांच्या पालकांजवळ दैवी शक्ती असते असे प्रतिपादन बी.एस. राजपाल यांनी केले तर डॉ. शिवकुमार भगत यांनीही स्वमग्न मुलांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी समाजाने पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. यावर्षीच्या पुरस्कारासाठी ममता शर्मा यांची निवड करण्यात आली असून मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. निखत शेख, पल्लवी सोनावणे, अरुणा जाधव आणि धनंजय अनंतवार या पालकांनी स्वमग्न मुलांना वाढवतानाचा त्यांचा प्रेरणादायी प्रवास उलगडला. आरंभच्या संचालिका अंबिका टाकळकर यांनी स्वमग्नता जनजागृतीचे महत्व प्रास्ताविकात सांगितले. त्यांनी सांगितले की, जोपर्यंत पालक लवकरात लवकर आपले मुल स्वमग्न आहे. याचा स्वीकार करणार नाहीत तोपर्यंत समाजाची दृष्टीही बदलणार नाही. त्यामुळे स्वीकार हाच एकमेव पर्याय असल्याचे प्रतिपादन केले. आरंभचे विश्वस्त मिलिंद दामोदरे यांनी स्वमग्न मुलांसाठी हक्काचे घर असावे त्यासाठी आरंभ करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंद पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक विजयश्री जाईबहार, अश्वीनी वांढेकर, निलीमा वावरे , पल्लवी सोनवणे, शोयेब शेख, रोफ्फ भाई, किरण जोशी, सिद्धेश रेवनकर, सोनल आणि रजिया मावशी यांनी परिश्रम घेतले.

https://epaper.sanjwarta.in/
Powered By : Vrudhee Solutions



लोकमत समाचार

## स्वमग्न विद्यार्थियों ने दी नुक्कड़ नाटक की प्रस्तुति

छत्रपति संभाजीनगर के सिद्धार्थ गार्डन में ऑटिज्म पर आधारित नुक्कड़ नाटक की प्रस्तुति दी गई. इस दौरान मौजूद आरंभ संस्था के शिक्षक व विद्यार्थी.

**छत्रपति संभाजीनगर.** विश्व ऑटिज्म दिवस के अवसर पर सोमवार को आरंभ संस्था द्वारा ऑटिज्म को लेकर जागरूकता सप्ताह की शुरुआत की गई. शहर के पर्यटन स्थलों के साथ ही अन्य स्थानों पर पोस्टर-बैनर और नुक्कड़ नाटक के माध्यम से लोगों को इस बीमारी के बारे में जानकारी दी जा रही है. आरंभ संस्था और एमजीएम के विद्यार्थियों के संयुक्त तत्वावधान में हाल ही में सिद्धार्थ उद्यान में ऑटिज्म को लेकर जनजागृति के उद्देश्य से नुक्कड़ नाटक की प्रस्तुति दी गई. इस अवसर पर आरंभ शिक्षा संस्था की संचालिका अंबिका टाकलकर, शिक्षक व एमजीएम के विद्यार्थी उपस्थित थे.

Apna Shahar
Page No. 4 Apr 04, 2024
Powered by: erelego.com

Autism Awareness Week plays a crucial role in promoting understanding, acceptance, and inclusion of individuals with autism. By raising awareness, challenging stereotypes, and fostering empathy, the campaign contributes to creating a more inclusive and supportive society for individuals with autism and their families.

**Best life, better world, making autism matter!**